**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.३६/२०२१ मधील</u>**

**<u>निशाणी १२४ वरील आदेश</u>**

**(गजानन बांदेकर वि. यशवंत बांदेकर व.१५)**

(**CNRNO.MHSI**04000148–2021)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी सर्व्हे नं.३०–अ, हिस्सा नं.१५ व सर्व्हे नं.३६–अ, हिस्सा नं.२० या दावा मिळकती प्रस्तुत दाव्यातून वगळण्यात यावे, याकरीता दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन की, प्रस्तुत दाव्यातील सर्व्हे नं.३०–अ, हिस्सा नं.१५ व सर्व्हे नं.३६–अ, हिस्सा नं.२० या मिळकती दावा परिशिष्ठ अ नुसार सर्व्हे नं.३०–अ, हिस्सा नं.१५ ही अनुक्रमांक ४ व सर्व्हे नं.३६–अ, हिस्सा नं.२० ही मिळकत दावा परिशिष्ठ ब मध्ये अनुक्रमांक ५ ला नमुद केलेली आहे. त्यामुळे सदरच्या मिळकती या दावा मिळकतीतून वगळण्यात यावे व इतर उर्वरित मिळकतीचे दाव्यात नमुद केल्याप्रमाणे सरस–निरस धडेवाटप होऊन मिळावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी वादी यांचे प्रस्तुतचे अर्जास म्हणणे दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज हा त्यांचे म्हणणे विना चालविणेत येत आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

४. प्रस्तुतचा दावा हा सरस–निरस धडेवाटप होऊन मिळणेकरीता तसेच हक्कप्रस्थापनेकरीता दाखल केला आहे. सदरच्या मिळकती या दावा परिशिष्ठ अ व ब येथे नमुद असल्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्यातून वगळल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही. तसेच प्रतिवादी यांचेदेखील कोणतेही नुकसान होत नाही. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांचेमधील वादाचे निराकरण होणेसाठी मदत होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्जात वादी

यांनी केलेली मागणी मान्य केल्यास कोणाचेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादी यांचा निशाणी १२४ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/–

दिनांक –१८.०८.२०२६.

(न. अ. बकरे)

सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.